महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
छत्रपती संभाजीनगर मंडळ स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
Email: chair.aurboard@mahedu.gov.in/sschscboardabad@gmail.com
Tel: Div.Chairman(P).: (0240):2331116 EPABX -2334228/2334284 .Div. Secretary (P).:2341035

जा.क्र./छसंविमं/उमासंकिर्ण/5455
दिनांक: 27/11/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर/जालना/बीड/परभणी/हिंगोली.

विषयः फेब्रु./मार्च २०२७ च्या परीक्षेची आवेदनपत्रे DRAFT मधून SEND TO BOARD करणेबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आगामी फेब्रु./मार्च २०२७ च्या इ.१० वी व इ.१२ वी परीक्षांचे नियमित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्यासाठी दिनांक ३०.११.२०२६ पर्यत मुदत देण्यात आलेली आहे.

तसेच कार्यालयाच्या दिनांक-३०.१०.२०२६ च्या पत्रान्वये दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे ऑनलाईनद्वारे मंडळाकडे सादर करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना (USER GUIDELINES) देण्यात आलेल्या आहेत. तरी सुध्दा बऱ्याच शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांचे आवेदनपत्रे DRAFT मध्ये दिसून येत आहेत. त्यांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

तरी सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी **मार्गदर्शक सूचना (USER GUIDELINES) नुसार दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करुन सदर आवेदनपत्रे DRAFT मधून SEND TO BOARD करण्यात यावी. कोणताही विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून तसेच परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.**

सोबतः-

१) मार्गदर्शक सूचना (User Guidelines) मंडळाच्या संकेतस्थळावर देण्यात आल्या आहे.
२) DRAFT मध्ये दिसुन येणाऱ्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची यादी.

विभागीय सचिव,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तवः-
मा.सचिव, राज्य मंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तवः-

१. शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करुन सदर आवेदनपत्रे DRAFT मधून SEND TO BOARD करणेबाबत पाठपुरावा करावा.

२. शिक्षणाधिकारी (माध्य), छत्रपती संभाजीनगर/जालना/परभणी/बीड/हिंगोली यांना कळविण्यात येते की, दुष्काळग्रस्त भागातील सर्व पात्र विदयार्थ्यांची परीक्षा शुल्क सवलतीची नोंद विहित मुदतीत पूर्ण करुन सदर आवेदनपत्रे DRAFT मधून SEND TO BOARD करणेबाबत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन पाठपुरावा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Desktop:/ACP